आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
५ ऑक्टोबर २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- स्वित्झर्लंडचे अध्यक्ष गाय पार्मेलिन यांचं तीन दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी नवी दिल्लीत आगमन/ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा

- रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीची बैठक सुरू

- मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या निलंबनाचा अंतरिम आदेश द्यायला सर्वोच्च न्यायालयाचा नकार

**आणि**

- पंजाबमध्ये प्रवासी बस उलटून झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू, १७ जण जखमी

<><><><><>

स्वित्झर्लंडचे अध्यक्ष गाय पार्मेलिन यांचं आज सकाळी ३ दिवसीय भारत दौऱ्यासाठी नवी दिल्लीत आगमन झालं. स्वित्झर्लंडच्या अध्यक्षांचं राष्ट्रपती भवनाच्या प्रागंणात औपचारिक स्वागत करण्यात आलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांचं स्वागत केलं. यावेळी त्यांना तिन्ही दलांकडून मानवंदना देण्यात आली. या दौऱ्यामुळे भारत आणि स्वित्झर्लंड या दोन्ही देशांच्या परस्पर संबंधांचं महत्त्व अधोरेखित करण्याची संधी मिळाल्याचं पार्मेलिन यांनी औपचारिक स्वागतानंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले. दोन्ही देशांमधील संबंध हे समान लोकशाही मूल्य, परस्पर विश्वास आणि आदरावर आधारित आहेत, असंही ते म्हणाले. स्वित्झर्लंडच्या अध्यक्षांबरोबर वरिष्ठ अधिकारी आणि उद्योग क्षेत्रातले नेते यांचा समावेश असलेलं उच्चस्तरीय शिष्टमंडळही भारत भेटीवर आलं आहे. स्वित्झर्लंडचे अध्यक्ष गाय पार्मेलिन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यात द्विपक्षीय चर्चा झाली.

<><><><><>

भारत अमेरिका व्यापार करारावर वाटाघाटी अद्याप सुरु असून त्यांना अंतिम स्वरूप आलेलं नाही असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत सुरु असलेल्या म्युनिक नेत्यांच्या बैठकीत त्या आज बोलत होत्या. सध्या या वाटाघाटी एका टप्प्यावर येऊन थांबल्या आहेत असं त्यांनी सांगितलं. भारताने सादर केलेल्या मसुद्यातील बहुतांश कलमं

भारताच्या बाजूने झुकलेली आहेत आणि त्यांवर अमेरिकेकडून सहमती मिळण्यासाठी भारत कसून प्रयत्न करत आहे असं त्या म्हणाल्या.

भारत आणि युरोपियन महासंघ यांच्यातला मुक्त व्यापार करार आतापर्यंतचा सर्वात मोठा व्यापार करार असून, यात समाविष्ट देशांचा जगाच्या एकूण स्थूल राष्ट्रीय उत्पादनात एक चतुर्थांश वाटा आहे असं त्यांनी सांगितलं. भारताने युरोपियन महासंघातल्या देशांसाठी साडे ९२ टक्के आयात शुल्क माफ केलं असलं तरी महासंघातल्या सर्व देशांमध्ये भारतीय मालाला मुक्त प्रवेश मिळाला आहे, त्यामुळे स्पर्धात्मकता टिकून राहील असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीची बैठक आज मुंबईत सुरू झाली. रिझर्व बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा येत्या बुधवारी सकाळी पतधोरण आढावा समितीच्या बैठकीत झालेले निर्णय जाहीर करतील. पश्चिम आशियातलं संकट आणि जागतिक स्तरावर विविध देशांच्या मध्यवर्ती बँकांनी वाढवलेल्या व्याजदरामुळे निर्माण झालेला महागाईचा दबाव याचा परिणाम म्हणून रेपो दर पाव टक्क्यांनी वाढण्याची शक्यता अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. रेपो दरात शेवटची वाढ फेब्रुवारी २०२३मध्ये झाली होती. त्यावेळी हा दर २५ शतांश टक्क्यांनी वाढून साडे सहा टक्क्यांवर नेला होता. त्यानंतर २०२३-२४ या संपूर्ण काळात हा दर स्थिर ठेवण्यात आला आणि २०२५मध्ये दरकपात करण्यात आली.

<><><><><>

तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि पश्चिम बंगालमधले पाच विधानसभा मतदारसंघ आणि आसाममधल्या एका लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठीचा प्रचार काल संपला. या सहा जागांसाठी उद्या मतदान होणार आहे, तर येत्या ९ तारकेला मतमोजणी होणारआहे. तामिळनाडूमध्ये मदुरांतकम आणि धारापुरम, पुद्दुचेरीतील थट्टनचावडी आणि पश्चिम बंगालमधील रेजीनगर आणि नंदीग्राम या विधानसभा मतदारसंघात तर, आसाममध्ये नागाव लोकसभा मतदारसंघासाठी हे मतदान होणार आहे. तमिळनाडू, पुद्दूचेरी आणि पश्चिम बंगालमध्ये विद्यमान आमदारांच्या राजीनाम्यानंतर विधानसभेच्या जागा रिक्त झाल्या आहेत, तर आसाममध्ये, काँग्रेस नेते प्रद्युत बोरदोलोई यांच्या राजीनाम्यानंतर नागांव लोकसभेची जागा रिक्त झाली आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या राजकीय कारकिर्दीला २५ वर्षं पूर्ण होत आहेत. ‘जनसेवेतून देशसेवा आणि सतत समर्पणभाव’ असा हा प्रवास आहे. सेवा आणि सुशासन या सूत्रांचा अवलंब करत २०४७ पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट साकार करण्यासाठी सरकार सातत्यानं काम करत आहे. सर्वसमावेशक विकास आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून नागरिकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडत आहेत. या विशेष मालिकेत आज आपण ऐकणार आहोत, **प्रधानमंत्री मुद्रा योजने**विषयी…

**होल्ड.. व्हीसी**

*(प्रधानमंत्री मुद्रा योजनेचा शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ८ एप्रिल २०१५ रोजी करण्यात आला. छोट्या व्यापाऱ्यांना व्यावसायिक गरजांसाठी सुलभ आणि विनातारण कर्ज पुरवठा करण्याच्या उद्देशाने ही योजना राबवण्यात येत आहे. या योजनेची विभागणी शिशु, किशोर, तरुण आणि तरुण प्लस अशा चार श्रेणीत करण्यांत आली आहे. पहिल्या श्रेणीत ५० हजार रुपयांपर्यंत, दुसऱ्या श्रेणीत ५० हजार ते ५ लाख रुपये, तिसऱ्या श्रेणीत ५ लाख ते १० लाख आणि चौथ्या श्रेणीत २० लाख रुपयांपर्यंत कर्ज पुरवठ्याची तरतूद या योजनेत आहे. प्रधानमंत्री मुद्रा योजनेचा अर्ज जनसमर्थ पोर्टल द्वारे ऑनलाइनसुद्धा भरला जाऊ शकतो. गेल्या ११ वर्षात ३९ लाख कोटी रुपयांचा कर्ज पुरवठा या योजनेअंतर्गत करण्यात आला असून त्यातील ६६ टक्के लाभार्थी महिला उद्योजिका आहेत.)*

**<><><><><>**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना निलंबित करण्याचा अंतरिम आदेश द्यायला सर्वोच्च न्यायालयानं आज नकार दिला. तसंच या प्रकरणी निवडणूक आयोग, ज्ञानेश कुमार आणि उर्वरित २ निवडणूक आयुक्तांना सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या पीठानं नोटिसा बजावल्या. निवडणूक आयोगानं दिलेल्या उत्तरात जर असं आढळून आलं, की काही निर्णय मुख्य निवडणूक आयुक्तांनी एकतर्फी पद्धतीनं घेतले, तर ते निर्णय रद्द ठरवण्याबद्दल विचार करू, असंही पीठानं स्पष्ट केलं.

**<><><><><>**

दिल्लीत शांततापूर्ण आंदोलन करायची परवानगी द्यायचे निर्देश दिल्ली पोलिसांना द्यायची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी घ्यायला सर्वोच्च न्यायालयानं आज होकार

दिला. सामान्य नागरिक, विद्यार्थी आणि नोंदणीकृत राजकीय पक्षांना शांततापूर्ण आंदोलन करायची परवानगी पोलीस देत नसल्याची माहिती एका वकिलांनी, सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या पीठाला दिली. त्यावर, तत्सम काही प्रकरण न्यायालयापुढे प्रलंबित आहे का, हे तपासून घेऊ आणि त्यावर सुनावणी घेऊ, असं न्यायालयानं सांगितलं.

<><><><><>

दिल्लीमध्ये २०१९ साली नागरिकत्व दुरुस्ती कायद्याच्या विरोधात झालेल्या निदर्शनांच्या नंतर जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठात झालेला हिंसाचार तसंच २०२० साली दिल्लीत झालेल्या दंगलीची चौकशी एसआयटी तर्फे करण्याची मागणी करणाऱ्या याचिका दिल्ली उच्च न्यायालयाने आज फेटाळल्या आहेत.

या दंगलीची चौकशी करण्यासाठी सत्यशोधन समिती स्थापन करावी, पीडित व्यक्तींना नुकसानभरपाई द्यावी, दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर एफआयआर दाखल करावेत इत्यादी मागण्या करणाऱ्या याचिकांवर न्यायमूर्ती विवेक चौधरी आणि न्यायमूर्ती मनोज जैन यांच्या पिठासमोर सुनावणी सुरु होती.

<><><><><>

पंजाबमध्ये चंदिगड इथे प्रवासी बस उलटून झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला तर १७ जण जखमी झाले. या बसमध्ये ४० जण प्रवास करत होते. चालकाचं बसवरचं नियंत्रण सुटल्यानं हा अपघात झाला. जखमींना लुधियाना इथल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

<><><><><>

बीजिंग इथे सुरू असलेल्या चीन खुल्या टेनिस स्पर्धांमध्ये तिसऱ्या फेरीत चेक प्रजासत्ताकाच्या निकोला बार्टुनकोवाने जागतिक मानांकनात दुसऱ्या क्रमांकावरच्या अरिना साबालेंका हिचा ६-४, ६-३ असा पराभव केला आहे. पुरुष गटात नोवोक जोकोविचने अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेचा विजेता अलेक्झांडर झ्वेरेव याचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

<><><><><>

हवामान विभागानं कर्नाटक, केरळ, माहे, तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि करैकल याभागात आज मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. येत्या २ दिवसात मराठवाडा आणि विदर्भाच्या अनेक भागातून तर छत्तीसगड आणि उर्वरित महाराष्ट्राच्या काही भागातून मान्सून माघार घेण्याची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे.  आज उत्तराखंड, तेलंगाना, पश्चिम बंगालच्या  गांगेय क्षेत्र तसंच लक्षद्वीपमध्ये वादळी वाऱ्यांसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे.

<><><><><>

प्रादेशिक हवाई संपर्क व्यवस्था अधिक वेगवान करण्याच्या उद्देशाने सुरू झालेल्या उडान योजनेंतर्गत पश्चिम बंगालमध्ये चार नवीन विमानतळ उभारण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार यांच्यात आज त्रिपक्षीय सांमजस्य करार होणार आहे. हा करार कोलकाता इथे केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री के. राम मोहन नायडू, मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी आणि 'भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत केला जाईल. ही प्रस्तावित विमानतळं पुरुलियामध्ये 'चारा', पश्चिम मेदिनीपूरमध्ये कलईकुंडा, दक्षिण दिनाजपूरमध्ये बालुरघाट आणि अलीपूरद्वारमध्ये हासीमारा इथे उभारली जातील.

//<><><><><>//